# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 385/2023 दिनांक : 08.10.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**1)देगलुर :–** दिनांक 05.10.2023 रोजी चे सकाळी 07.15 वा. चे सुमारास, **मौ. चैनपुर गावाचे लगत तळयाजवळ ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आठ आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी याचे ट्रॅक्टरच्या चाकाचा धक्का पोचल्लू नागनाथ कायतवाड याचे कुत्र्याचे शेपटीस लागल्याने तो फिर्यादीस शिवीगाळ करून ट्रॅक्टरखाली ओढुन मारहाण करत असल्याने फिर्यादीचे वडील गंगाधर रामन्ना हेडडे हे तेथे येवुन आरोपीस तु कशाला भाडणे करतोस असे म्हणुन समजावुन सांगत असतांना आरोपीने फिर्यादीचे वडीलास दगडाने डोक्यात मारून गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला. व इतर आरोपीतांनी मिळुन फिर्यादी व साक्षीदार यांना लाथा बुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. वगैरे **फिर्यादी दत्तात्रय गंगाधर हेडडे, वय 39 वर्षे, व्यवसाय शेती रा. चैनपुर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 437/2023 कलम 307, 341, 143, 147, 148, 149, 324, 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री घोंगडे, मो.क्रं. 8275266564** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 04.10.2023 रोजी चे 09.00 ते 01.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरा समोर मोंढा सिडको नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा युनिकॉर्न कंपणीची मो. सा. क्रं एमएच–26/बीएन–7598 किंमती 35,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी नागनाथ दगडोबा मुंढे, वय 60 वर्षे, व्यवसाय शेती रा. मुंढेवाडी ता. कंधार ह. मु. मोंढा सिडको नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 711/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/811 यालावार, मो. क्रं. 9923696860** हे करीत आहेत.

**2)अर्धापुर :–** दिनांक 04.10.2023 रोजी चे 11.00 ते दि. 05.10.2023 चे 06.00 वा. चे दरम्यान, **मौ. गिरगाव चौक जवळ मालेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पलेंडर प्लस कंपणीची मो. सा. क्रं एमएच–26/बीव्ही–9028 किंमती 50,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी किशन विठ्ठल लांडगे, वय 35 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. देळुब बु. ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरन 375/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1279 चव्हाण, मो. क्रं. 9356283717** हे करीत आहेत.

## 3)जनावर चोरी :–

**कुंटूर :–**दिनांक 04.10.2023 रोजी चे 22.00 ते दि. 05.10.2023 चे 06.00 वा. चे दरम्यान, **मौ. कुंटूर ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा रात्रीला त्याचे घराजवळ शेळया मेंढया जाळी लावुन बसविले असता यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून मेंढयाच्या कळपातुन एक मेंढी बकरा किंमती 20,000/–रू चा मो सा वर नेऊन भासवाडा तेलंगणा येथील बाजारात विक्री केला. वगैरे **फिर्यादी गोविंद संतुका सभाडे, वय 58 वर्षे, व्यवसाय मेंढीपाळ रा. कुंटूर ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 181/2023 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1198 एमएस कंधारे, मो. क्र. 8856080025** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**बिलोली :–**दिनांक 07.10.2023 रोजी चे 10.30 वा. चे सुमारास, **मुतन्याळ गावचे पुलाजवळ रोडवर ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा कोर्टाचे साक्षीला येत असतांना यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून तु आमच्या बहीणीला का नांदवण्यास नेत नाहीस असे म्हणुन फिर्यादीचे उजव्या हाताच्या अंगठयाला मारहाण केल्याने फॅक्चर केले. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी नागनाथ देवराव पेठेकर, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. खतगाव ता. बिलोली जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरन 175/2023 कलम 325, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1963 गुडमलवार, मो. नं. 8421453868** हे करीत आहेत.

## 5)शासकीय कामात अडथळा :—

**वजिराबाद :—** दिनांक 20.09.2023 रोजी चे 16.00 वा. चे दरम्यान, **बसस्थानक नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा मुखेड आगाराची बस क्रमांक एमएच—20/बीएन—1757 ही नांदेड बसस्थानक येथे मुखेड जाणाऱ्या गाडयावर लावली असता सदर गाडीत चढणारे प्रवासी मारोती नागोबा मामीलवाड रा. मुखेड संकट कालीन दरवाजा काढुन बसमध्ये चढत असतांना फिर्यादीने त्यांना येथुन का चढता असे विचारता त्याने फिर्यादीस गाडीमधुन लाथ मारली व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देवुन शासकीय कामात अडथळा निर्माण केला. वगैरे **फिर्यादी चंद्रकांत शंकरराव मंगनाळे, बसचालक रा. प. म. म. राज्य मुखेड आगार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 444/2023 कलम 353, 323, 504, 506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री आगलावे, मो.क्र. 9890630130** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड